# महिलांच्या मानवी हक्काविषयी कायदे : एक चिकित्सक अभ्यास

**प्रा. अभिजीत अशोक कांबळे**, नाइट कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर
**प्रा. सुरेश जयराम फराकटे**, नाइट कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर

---

**सारांश-**

स्वातंत्र प्राप्ती नंतर भारतीय संविधान मध्ये महिला विकासासाठी एक नवे पर्व सुरू झाले. संविधानाच्या माध्यमातून महिलांना समान हक्क, महिलांची स्थिती सुधारण्यासाठी विविध कायदे तयार केले. याचा प्रत्यक्षात अवलंब करून महिला सक्षमिकरण करण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु या सगळ्या प्रयत्नानंतर देखिल एक प्रश्न निर्माण होतो? की भारतीय महिला खरेच स्वतंत्र, समानता, आत्मसन्मानाने जीवन जगत आहे. प्राचीन काळापासून स्वातमत्र्यप्राप्तीपर्यंत मानले जात होते की, महिलांच्या विरोधी अपराध हे महिलांच्या अशिक्षित आणि शिक्षणाचा प्रसार प्रचार न झाल्याने होत आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारी प्रयत्नातून शिक्षणाचा प्रचार-प्रसार होऊन महिला शिक्षित होऊन शिक्षित महिलांची वृध्दी झाली. तरी देखिल दुर्भाग्यपूर्ण स्वरूपात प्रतिदिवस महिलांवर होणारे अपराध मध्ये कमी न होता वृध्दी होत आहे. एका अहवालानुसार प्रत्येक पाच मिनीटात एका महिलेची छेडछाड होत आहे, दहा मिनीटात बलात्कार, प्रतिदिवस विवाहीत महिलांना हुंड्यासाठी मारून टाकले जाते. ७० टक्के महिला कुटुंबातील अत्याचाराचा जाळात कोणत्या ना कोणत्या स्वरूपात आढळतात.

कायद्याने महिलांना मिळालेले हक्क कितीही असले तरी ते प्रत्यक्षात उतरविण्यास सामाजिक पाश्र्वभूमी तयार झालेली नाही. याला काही अंशी महिलाही कारणीभूत असेल. १९ शतकातील राजकीय घडामोडीनंतर महिला विचारांना चालना मिळाली व परिवर्तनाला सुरूवात झाली. शिक्षणप्रचार, सामाजिक सुधारणा व वृत्तपत्रातून होणारे सामाजिक प्रबोधन यामुळे महिलांच्या हक्काविषयी दिशा मिळाली. परंतु महिलांवरील अन्याय, अत्याचार कमी झालेले आहेत का? कारण वर्ग, वंशजात आणि पुरूषप्रधान असलेल्या शोषण, अन्याय, अत्याचार होतच राहिलेत. त्यांच्या मुलभूत हक्कापासून त्यांना वंचित ठेवल्या गेले आणि महिलाही समाजाचा एक घटक आहे याचे भानच राहिले नाही.

**बीज संज्ञा** :- महिलांचे हक, कायदे, कायदेविषयक जनजागृती

**प्रस्तावना-**

स्वतःबद्दलचा आत्मविश्वास वाढविणे, सामाजिक, आर्थिक, राजकीय व सहकार क्षेत्रात महिलांचा सहयोग व सकारात्मक दृष्टिकोन लक्षात घेतल्या गेला पाहिजे. स्त्रियांची चिकित्सक वृत्ती जागृत करणे निर्णय क्षमतेत तिचा प्रतिक्रिया लक्षात घेणे, व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य तिला मिळाले पाहिजे. तिची स्वतंत्र मते लक्षात घेतली पाहिजे, माहिती, ज्ञान, कौशल्य व आत्मविश्वास या गोष्टीची जाणीव व आकलन तिला व्हायला पाहिजे, लैंगिक भेदभाव न होता समान कामाची न्याय मागणी झाली पाहिजे.

८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन मानला जातो. १९७३ ला युनोने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष मानले. भारत सरकारने १९९० व्या वर्षी 'स्त्री हक योजना' ची स्थापना केली. शासनाने १९९३ या वर्षी 'राज्य महिला आयोगा'ची स्थापना केली तर २००१ हे वर्ष 'महिला सक्षमीकरण' म्हणून घोषित केले. स्वातंत्र्योत्तर काळात महिला व पुरुष यांना समान पातळीवर जगण्याचा हक्क संविधानाने दिला म्हणून वर्तमानकाळात महिला पुरूषांच्या खांद्यास खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात कार्य करतांना आढळून येतात.

भारतात दरवर्षी विविध कारणाने महिला मृत्यूमुखी पडतात. त्यांच्या आरोग्याकडे केले जाणारे दुर्लक्ष, घरातील गरिबी, अशिक्षितपणा आणि प्रसुती दरम्यान होणारे मृत्यू अशी प्रमुख कारणे महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे निराकरण करणे, महिलांचा आर्थिक दर्जा सुधारणे, स्त्री संवेदनशील धोरणांना प्रोत्साहन देणे, प्रसारमाध्यमांचा वापर करून महिलांच्या हक्काप्रती जनजागृती करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये तसेच इतर सर्व विकास क्षेत्रामध्ये महिलांचा सहभाग वाढवून त्यांना आर्थिक, सामाजिक आणि कौटुंबिकदृष्टया सुरक्षित करण्यावर भर देण्यात महिलांच्या हक्कासाठीचे शासनस्तरावर कायदे होत आहेत. मुलीच्या जन्माला येण्याच्या अधिकारापासून ते तिच्या पोषणमुल्यापर्यंतचे हक्क. महिलांच्या आर्थिक, सामाजिक आणि कौटुंबिक सुरक्षितता.

**उद्देश** :- प्रस्तुत शोधनिबंधाचे उद्देश खालील प्रमाणे आहेत.

1. महिलांविषयक अस्तित्वात असलेल्या कायद्याचा अभ्यास करणे.
2. महिलांना आपल्या हक्काविषयी जागृत करणे.

3. महिलांमध्ये महिलाविषयक कायद्याची जनजागृती करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केला आहे. सदरील विषयाचा अभ्यासासाठी व्दितीय स्वरुपाचा सामुग्रीचा उपयोग करण्यात आला. यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, नियतकालिका, मासिके, शासकीय-निमशासकीय अहवाल, संशोधन लेख, संकेत स्थळावरील माहिती इत्यादी लिखित साधन सामग्रीचा उपयोग केला आहे. संकलित केलेल्या माहितीचे शास्त्रीय पध्दतीने संस्करण करुन विश्लेषण केलेले आहे.

**विषय विवेचन**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या ४२ व्या कलमात मानवी हक्कांचे अधिकार दिलेले आहेत. त्यांनी हे कलम म्हणजे भारतीय घटनेचा आत्मा आहे असं म्हटलं होत. शेती, उद्योग, सेवा क्षेत्रातील विकासाच्या लाटेत तसंच जागतिकीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे बदलत्या जीवनशैलीमुळे हक्कांचं कुठेही उल्लंघन होऊन सामान्य घटकावर अन्याय होऊ नये म्हणून या कायद्यात खास काळजी घेतली आहे. तरीपण मानवी स्वातंत्र्याचे फायदे उपेक्षित, तळागाळातल्या माणसापर्यंत पोहचलेले नाहीत. महिलांच्या मानवी हक्काविषयी जनमानसात जागृती होणं गरजेचं आहे.

१) बाल विवाह प्रतिबंधक कायदा (१९२९ व १९८६)

या कायदानुसार आठरा वर्षा खालील मुलीचा विवाह करता येत नाही. असे झालेतर विवाह लावणाऱ्या आई-वडिलांवर कायद्याने गुन्हा दाखल करता येतो. तसेच याविषयीची नातेवाईक शेजारी किंवा कोणीही असा विवाह होणार असल्याची माहिती जरी दिली तर तो विवाह कायद्याने आडवता येतो.

२) किमान वेतन कायदा (१९४८)

महिलांना मजुरीच्या स्वरुपात कमीत कमी किती वेतन असावे हे निश्चीत करणारा कायदा म्हणजेच किमान वेतन कायदा होय. विविध उद्योग क्षेत्रात काम करणारा महिलांना किमान वेतन, आठवडा मध्ये एक सुट्टी, प्रति दिवस आठ तासापेक्षा अधिक काम लावु नाही असे बंधने या कायद्या अंतर्गत निश्चित केले.

३) हिंदू विवाह कायदा (१९५५)

या कायद्यानुसार पत्नी जिवंत असताना दुसरे लग्न करता येत नाही. दुसऱ्या पत्नीस संपत्तीमध्ये कायदेशीर अधिकार नाही. पती व्याभीचारी, बाहेरख्याली असेल तरी घटस्फोट घेता येतो. पती पत्नी मध्ये दोन वर्षे संबंध न असल्यास पत्नी घटस्फोट घेऊ शकते. घटस्फोटीत पत्नीस उदरनिर्वाहासाठी पोटगीच्या स्वरुपात दर महा रक्कम द्यावी लागते. पतीच्या संपत्ती मधील अर्धा वाटा कायदेशीर रित्या पत्नीस मिळतो. घटस्फोटानंतर सातवर्षी पर्यंतची मुले आई सोबतच राहतील व त्याचा पालन पोषनासाठी देखील रक्कम द्यावी लागते.

४) पालनपोषण कायदा (१९५६)

पती-पत्नी सोबत राहत नसतील तर हिंदु महिलाना पाल पोषणासाठी आपल्या पतीकडून आवश्यक संपत्ती किंवा रक्कम प्राप्त करण्याचा अधिकार या कायद्यानुसार आहे. याशिवाय पती जर मुद्दाम पत्नी पासून दूर राहत असेल, पतीपासून महिलांना धोका किंवा भिती निर्माण झाली असेल, पतीला असाध्य रोग किंवा असाध्य आजार असेल, पती बाहेरख्याली किंवा दुसऱ्या महिलेसोबत राहत असेल, तसेच पतीने धर्म परिवर्तन केला असेल तर या कायद्यानुसार त्या महिलेस वरील अधिकार मिळतो.

५) प्रसुती कायदा (१९६१)

गर्भवती महिला कर्मचाऱ्यासाठीचा प्रसुती कायदा १९६१ यानुसार, गर्भवती महिलांना तीन महिने कार्यालयन सुट्टी घेता येते, ही सुट्टी कधी घ्यावयाची आहे हा अधिकार त्या महिलांचा आहे. या तीन महिनांचा रजेचा कालावधीतील मानधन किंवा पूर्ण पगार शासन मार्फतच्या महिलेला दिला जाता.

६) हुंडा प्रतिबंधक कायदा (१९६१ व १९८६)

या कायद्यानुसार, हुंडा मागणे आणि हुंडा देणे हा कायदेशीर गुन्हा आहे. तसेच हुंडा देणे किंवा घेणे यामध्ये मदत करणारा देखील गुन्हेगार ठरतो. हा गुन्हा सिध्द झाल्यास हुंडा मागणाऱ्यास कमीत कमी सहा महिने कैद व दंड तर हुंडा घेणाऱ्यास पाच वर्षापर्यंत कैद व नुकसान भरपाई अशी तरतूद आहे.

७) गर्भ चिकित्सा कायदा (१९७१)

बाळ गर्भात असल्यांस आईच्या जिवास धोका असेल, शारीरिक व मानिसिकतेला धोका असेल, बलात्कारातून गर्भधारणा झालेली असेल, तपासनीनुसार बाळ विकलांग असेल तर अशा परिस्थितीमध्ये डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार गर्भ चिकित्सेव्दारे कायदेशीर रित्या गर्भपात करता येतो.

८) अश्लील चित्रण विरोधी कायदा (१९८६)

या कायद्यानुसार कोणत्याही महिलेचे अश्लील चित्रीकरण करणे किंवा अश्लिल फोटो काढणे अशा अपराधासाठी प्रारंभी दोन वर्षे व फेर अपराधांसाठी पाच वर्षे कैदेची शिक्षा होते.

९) स्त्री अशिष्ट निरुपण विरोधी कायदा (१९८६)

भारतात कोणत्याही प्रकारच्या वस्तुंच्या प्रसिध्दीसाठी जाहिरातीमध्ये महिलांच्या अश्लील फोटोचा वापर करण्यात येत होता. त्यासंबंधी प्रमाण रोखण्यासाठी या कायदाचा वापर केला जातो. यानुसार महिलांचे जाहीरातीसाठी अश्लील चित्र वापरणे किंवा पोस्टरवर अंगप्रदर्शन करणे कायद्यानुसार गुन्हा आहे.

१०) वेश्यावृत्ति निवारण कायदा (१९८६)

महिलांना अनैतिक कार्यामध्ये दुरुपयोग करणाऱ्यावर प्रतिबंध घालणारा हा कायदा आहे.

११) सती निषेध कायदा (१९८७)

महिलेचा पती मृत्यु पावल्यावर त्या महिलेला सती जाण्याची प्रथा होती. हे थांबवण्यासाठी कायदा

१२) प्रसुती पुर्व तपासणी विरोधी कायदा (१९९४)

गर्भावस्थेमध्ये बालिका भ्रूण ची ओळख करण्यावर निर्भद घालणारा प्रसुती पुर्व तपासणी विरोधी कायदा करण्यात आला.

**निष्कर्ष** –

सद्यस्थितीचा विचार करताना स्त्रियांना सक्षम बनविण्याच्या दृष्टिने व आत्मनिर्भयतेसाठी अनेक कायदे झालेले आहेत. म्हणून आता स्त्रियांनी स्वतःला कमी न लेखता आपले कर्तुत्व, कार्यशैली सिध्द करण्यासाठी स्वतः पुढाकारघेवून समोर येणेगरजेचे आहे. स्त्रियांची पुरूषप्रधानतेतून आजपर्यंत सुटका झालेली दिसत नाही. सर्वच क्षेत्रात तिचे शारिरीक, मानसिक, आर्थिक शोषण होत असून बदलत्या काळात पुरूषी अत्याचारांनी वेगळे रूप धारण केले आहे. कुटुंबात, समाजात, नोकरी क्षेत्रात ती पुरूषी अन्याय, अत्याचाराला बळी पडत आहे. आजही मानवी समाजाचा एक घटक म्हणून स्त्रियांना मान्यता मिळाली नाही. कायद्याने महिलांना मिळालेले हक्क कितीही असले तरी ते प्रत्यक्षात उतरविण्यास सामाजिक पार्श्वभूमी तयार झालेली नाही. याला काही अंशी महिलाही कारणीभूत असेल. कारण महिलांना आपल्या हक्काविषयी जाणीवपुर्वक जागृत राहणे व ते मिळविणे या बद्दल समज फार थोड्या महिलांना आला आहे.

**संदर्भ सूची :-**

1. रावत ज्ञानेंद्र (२००९) नारी एक समाजशास्त्रीय अध्ययन, विश्वभारती पब्लिकेशन, नई दिल्ली.
2. कोळंबे रंजन (२०१२) मानव संसाधन विकास व मानवाधिकार, भगीरथ प्रकाशन, पुणे.
3. अल्टेकर ए.एस. (१९३८) पोजीशन ऑफ विमन इन व हिंदू सिविलाईजेशन, बनारस कल्चर पब्लिकेशन, बनारस
4. डॉ. यादव अनुपमा (२००६) मानव अधिकार और महिलाएँ, नई दिल्ली
5. कमलेश कुमार गुप्ता (२००५) महिला सशक्तीकरण, बुक एनक्लेब, जयपूर
6. राजपूत धोंडिराम (२०११) सक्षम महिला, शुभ प्रकाशन, औरगांबाद
7. संकेतस्थळे